# // प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना कळविण्यांत येते की, Animal Welfare Board of India (Animal Birth Control, Rules 2023) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट मांजरावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरणाचा ठेका मे. प्रतापराव राणे एज्युकेशन ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, यांना देण्यात आलेला असून सदर प्रकल्प पशु पक्षी उपचार केंद्र, अयप्पा मंदीर जवळ, मिरारोड पूर्व येथे कार्यान्वीत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट मांजरावर 100 % निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण प्रस्तावित असून आपल्या कार्यक्षेत्रातील निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण न झालेल्या मांजरांची माहिती **मे. प्रतापराव राणे एज्युकेशन ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, यांना मो. नं.** 8976835431 वर देण्यात यावी. यापुर्वी मोकाट मांजरावर निर्बिजकरण व शस्त्रक्रिया केलेल्या मांजराच्या उजव्या बाजुच्या कानावर V आकाराचे चिन्ह करण्यात येते. ज्या मांजराच्या उजव्या बाजुच्या कानावर V आकाराचे चिन्ह नसेल अशा मांजराची माहिती वरील भ्रमणध्वनी क्रमांकावर देण्यात यावी जेणेकरून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मांजरांवर 100 % निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण शक्य होईल.

सदरचे काम AWBI Rules 2001 नुसार करण्यात येत असुन प्राणी प्रेमी संघटना व इतर व्यक्ती मार्फत मोकाट मांजर पकडणे व सोडणे अशा ठिकाणी तसेच ह्या संबधित कामाबाबत अडथळा करण्यात येउ नये अन्यथा संबधितावर कायदेशीर कारवाई प्रस्तावीत करण्यात येईल यांची कृपया नोंद घ्यावी.

(रवि पवार)
उप-आयुक्त (पशुसंवर्धन),
मिरा भाईंदर महानगरपालिका